## सुधारित मसुदा

सोलापूर महानगरपालिका सोलापूर महिला व बालकल्याण समिती विभागाच्या वतीने सोलापूर शहरातील मुली व महिलांना (MSCIT/TALLY/BFSI) संगणक प्रशिक्षण देण्यात येणार आहे त्यासाठी खालील नमुद पात्रता धारण करणा-या संस्थांनी म.न.पा च्या www.solapurcorporation.gov.in या वेबसाईट वर दि.04.09.2024 ते दि.06.09.2024 पर्यंत आपली नावे नोंदवावीत.

1. इच्छुक संस्था ही शासनाचे अंगीकृत उपक्रम असलेल्या (MKCL,KLIC)कडील नोंदणीस दिनांक ३१/०३/२०२४ पर्यंत तीन वर्षे पूर्ण झालेली व सन 2024-25 या आर्थिक वर्षाकरिता नुतनीकरण झालेली असावी. तसेच स्थानिक (सोलापूर शहरातील )असणे आवश्यक आहे.

2 . प्रशिक्षण संस्थेकडे किमान ३० संगणक संचाची जोडणी असणे व संबंधित विषयाचे नोटस तसेच शासनमान्य प्रमाणपत्र देण्याची सोय असणे बंधनकारक राहील.

**3 महाराष्ट्र ज्ञान महामंडळ मर्यादित (MKCL) यांचे कडील संदर्भ क्र.MKCL-PPF/2023 / 01 दि.18.01.2023 चे पत्रान्वये कोरोना कालावधीतील प्रवेश संख्येमध्ये सवलत देण्यात आलेला आहे. त्या अनुषंगाने सन 2021 या वर्षासाठीचे प्रवेश मर्यादा शिथिल करण्यात आले. त्यानुसार प्रशिक्षण संस्थेने मागील दोन (2) वर्षात प्रतिवर्षी किमान 120 मुला / मुलींना MSCIT/TALLY /BFSI चे प्रशिक्षण दिलेले असावे. याबाबत स्थानिक LLC कडील दाखला अर्जा सोबत जोडणे आवश्यक राहील.**

4.लाभार्थींच्या हजेरीची नोंद संगणकीय प्रणाली द्वारे (Biometric system) घेण्याची सोय असावे तसेच लाभार्थी हे महिला असल्याने आरोग्याच्या दृष्टीने भौतिक सुविधा असणे बंधनकारक आहे.

5.प्रशिक्षण घेणे बाबतचे आदेश देणे अथवा नाकारणे किंवा स्थगित ठेवण्याचे सर्व अधिकार सक्षम अधिकारी यांचे कडे राखून ठेवले आहेत.

6.ज्या संस्थेचे अर्ज मंजूर करण्यात येईल त्या संस्थेने उपलब्ध बजेट तरतूदीच्या ३% रू.3,00,000/- अक्षरी रूपये तीन लाख सुरक्षा रक्कम भरणे. बंधनकारक राहील व शा.प.क्र. झेड.पी.ए./2009/प्र.क्र.514/वित्त-9,दि.20-11-2009 मधील तरतुदीनुसार स्वखर्चाने जनरल स्टॉम पेपरवर शपथ पत्र करुन करारनामा सादर केल्या नंतर work-order देण्यात येईल.

7.कोणत्याही कारणास्तव प्रशिक्षण मधेच सोडून अथवा खंडित केल्यास /अर्धवट राहिल्यास मंजूर अनुज्ञेय रक्कम मिळणार नाही. व संस्थे ची सुरक्षा रक्कम जप्त करण्यात येईल.

8.केंद्रामध्ये प्रशिक्षणावरून अथवा अन्य कारणास्तव तक्रार प्राप्त झाल्यास त्या केंदाचे तक्रार निवारण होईपर्यत प्रशिक्षण शुल्क अथवा सुरक्षा रक्कम अदा केले जाणार नाही.

9.संस्थेने आदेशात नमुद केले प्रमाणे लाभार्थ्यांचे हजेरी पत्रक ठेवणे बंधन कारक राहील.तसेच एम.एस.सी.आय.टी.संगणक परिक्षा ONLINE असल्याने त्याचे उत्तीर्ण झालेचे प्रोविजनल प्रमाणपत्र व हजेरी पत्रक, देयका सोबत देणे बंधनकारक असेल.उत्तीर्ण झालेल्या लाभार्थ्याचे देयक अदा करण्यात येईल.

10.प्रशिक्षणा दरम्यान कोणत्याही कारणास्तव वाद किंवा तंटा निर्माण झाल्यास संस्थेस न्यायालयात जाता येणार नाही.

11. .MKCL, KLIC या संस्थेच्या मंजुर दरानुसार देयक अदा करण्यात येईल.

3/9/24.

सहाय्यक आयुक्त-३
सोलापूर महानगरपालिका